# लेडिज हॉस्टेल

प्रतिक्षा - सर्वसामान्य-कुटुंबातली सर्वसामान्य मुलगी असून ती कधी विद्यविद्यालयाची पायरी चढली नव्हती. विवाहबंधनाने ती योग्य वयात प्रतिकशी बांधली गेली होती. दोघे एकमेकांना अनुरूप होते. दीर - नणंद - जावा - सासूसासरे - असे लेकुरवाळे कुटुंब होते. चार दिवस सासूचे अशी परिस्थिती तर अजिबातच नव्हती, मग तिला सासुरवास कसा असणार? तिला सून म्हणून घरात घेऊन येताना तिच्या सासऱ्यांनी त्यांच्या व्याह्यांना दिलेले वचन "आमची सून आमची मुलगी आहे- तिची अजिबात काळजी करू नका" हे वचन तंतोतंत पाळले जात होते. प्रतिक्षा साधी HOUSE Waif होती. तिला घरगृहस्थी आवडत असल्याने संसारात रमलेल्या - आपल्या पतीला आणि आपल्या माणसांना सतत आनंदी ठेवावे, आपला संसार आनंदी असावा - इतकीच काय ती - तिची अपेक्षा - होती. काळाबरोबर काळ लपंडाव खेळत खेळत पुढे सरकला. प्रतिक्षाला दोन - मुली झाल्या. मोठी मुलगी आयुर्वेदिक डॉक्टर तर धाकटी महिला विद्यापीठात - प्राध्यापिका पद लीलया सांभाळत होती. तो काळ ना नवा ना धड जुना असा होता. प्रतिक नावाजलेल्या औषधांच्या मोठ्या कंपनीत JOB करीत होता. प्रतिक्षाने नोकरी करून अर्थार्जन करावे असे प्रतिकला कधी वाटलेच नाही. औषधाच्या ह्या मोठ्या कंपनीची मालकी हक्काची खूप मोठी जागा होती. तिथे कर्मचाऱ्यांसाठी कंपनीने - त्यांच्या त्यांच्या ग्रेडनुसार क्वार्टर्स बांधले होते. सोसायटीत बालोद्यान - अद्यावत शाळा - सार्वजनिक वाचनालय - सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी वेल्फेअर सेंटर - होते. तिथे मोठमोठ्या प्रसिद्ध कलाकारांचे संगीत कार्यक्रम होत होते. खेळाची आवड असणाऱ्या मुलामुलींसाठी बॅडमिंटन हॉल - सिनेमागृह - भजनी मंडळ - लेडीज क्लब - विठोबा मंदिर - शहरातून कंपनीत कामावर येणाऱ्या कामगारांसाठी स्वतःच्या बसची सोय - सोसायटीच्या मालकीचे हॉस्पिटल - तिथे तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती अशा अद्यावत सुखसोयीयुक्त कंपनी म्हणजे एक लहानसे गावच वाटायचे. तिथे सर्वच सर्वांचे परिचित होते. जे विद्यार्थी बाहेरच्या शहरात त्यांच्या शिक्षणासाठी जायचे त्यांनासुद्धा आपापल्या घरी परत जाण्यासाठी कॉलनीत ठराविक अंतरावर बसथांबे होते. हातापायाशी असलेल्या सुखसोयींनी युक्त कॉलनी असली तरी प्रत्येक कर्मचारी आपापली निवासी सोय अर्थात स्वतःचे घर असावे ही सदिच्छा बाळगूनच होते. सोसायटीतल्या सदस्यांनी

पुढचा पुढचा बसून स्वत:च्या घराचा प्रस्ताव आपापसामध्ये मांडला योग्य विचार - भविष्याची तरतूद म्हणून शहरात स्वत:ची दुसरी कॉलनी निर्माण केली. आणि शहरातूनच कंपनीत कामावर येऊ लागले. आपल्याला कंपनीत पेन्शनचा लाभ नाही - आपल्याला पुत्रप्राप्ती नाही, या सुविचाराने निदान प्रतिक्षाची अर्थार्जनाची व्यवस्था करावी - ते माझं कर्तव्य आहे - असा विचार करून - प्रतिक्षाला स्वत:च्या घराच्या वरच्या हॉलमध्ये दहा पलंग टाकून 'वर्किंग वुमेन्स होस्टेल' काढू असा प्रस्ताव मांडला - योग्य विचार असल्याने प्रतिक्षाने तो प्रस्ताव स्विकारला. लगेच वरच्या हॉलमध्ये - पलंग - गाद्या - उशा - पलंगपोस - चादरी - पांघरूणे - बेडकव्हर्सची सोय केली, आणि घरगुती वुमेन होस्टेल उभे केले - आजुबाजूची उघडीजागा हिरव्या पडद्यांनी बंदिस्त केली - सोसायटीच्या अटीतटी - कायदेशीर नियमांचे पालन - कायदे - सर्वकांही सुरक्षितता पाळून नंतर वृत्तपत्रात जाहिरात दिली. बाहेरगावाहून शहरात उच्च शिक्षण घेण्यास येणाऱ्या मुला - मुलींचे पालक प्रतिक्षाकडे चौकशीला येऊ लागले. सुरक्षिततेची - चांगल्या लोकेशनची खात्री पटल्यानंतर Admition घेऊ लागले. मर्यादित संख्या असल्याने गडबड गोंधळाचा प्रश्नच नव्हता - तिथे फक्त मुलींची निवास व्यवस्था उत्तम होती. मुली आपापल्या कॉलेजच्या कॅन्टिनमध्ये - चहा नाश्ता घेत होत्या. सर्वबाजूनी विचार केल्यानंतर प्रतिक्षाने मनोमन ती जबाबदारी स्विकारली अल्पकालातच मुलींच्या दृष्टीने निवासाची खात्रीची सोय - सभोवतालचे सुंदर वातावरण - मुलींची काळजी घेणाऱ्या प्रतिक्षाचा स्वभाव आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सोसायटीतल्याच बालबोध सदस्याने - मेटकरी असे नांव देऊन सुरू केलेली टिफिन सर्व्हिस - असल्याने मुलींना आपापल्या सोयीनुसार करमणुकीचे योग्य माध्यम मिळाले. सर्वांना हा दुग्धशर्करा योग जुळून आल्याने समाधान मिळाले. सह - साहस - सातत्य अशी करमणुकीची - नोकरीची गुरुकिल्ली असलेले लेडिज होस्टेल मिळालेच. यापेक्षा अधिक पालकांना काय हवे? काय अपेक्षा त्यांनी कराव्या? असेअसे होस्टेल वाढविण्याचा प्रतिक्षाचा विचार होताच. सागरात जसे कमीदाबाचे पट्टे सहजच तयार होतात, चक्रीवादळे निर्माण होतात - तसेच प्रतिक्षाच्या जीवनात नकळतच काळेकुट्ट ढग दाटले - आकाश ढगांनी व्यापले. नकळतच - प्रतिकला गंभीर आजाराने घेरले, परंतु संयमसहनशीलता बाळगून प्रतिकने मात्र प्रतिक्षाला कांही कळूच दिले नाही. तो औषधे घेत नव्हता की कशाची काळजीच

दाखवत नव्हतो – कदाचित प्रतिक्षाला सुरू करून दिलेले लेडीज होस्टेल – हीच त्यांच्या जीवनाच्या वाढत्यापुर्तीची शांतता असावी. प्रतीक फक्त त्याच्या प्रतिक्षाच्या भविष्याचा विचार – पुर्ण केल्याच्या आनंदात होता. कोंबडा आरवला नाही म्हणून दिवस उगवायचा थोडाच थांबतो – तसा अखेर व्हायचा तोच – परिणाम झाला – एकवेळ साधुन नियतीने दोन घडीचा खेळ उधळला आणि प्रतिक्षाचा आधारवड कोसळला. प्रतिक्षा एकटी पडली. शासनाच्या संपर्कच नसल्याने – नियुक्ती – निवृत्ती – सेवा – सेवाव्रती – सेवामुक्ती – पेन्शन – शासनाने आखलेली लक्ष्मणरेषा – अशा शासकीय शब्दांचा परिचय तिला झालेलाच नव्हता. अशा हृदयात कालवाकालव निर्माण करणाऱ्या घटना घडल्यानंतर प्रतिक्षाचे सगेसोयरे – नातेवाईक – मैत्रिणी – जीवाभावाची विनी माणसे तिचे सांत्वन करण्यासाठी येत होते – नानाप्रश्न मैत्रिणींनी विचारत होते. आता ती सामान्य गृहिणी नव्हती – तर एक यशस्वी उद्योजिका होती. सर्वांचे प्रश्न ती हळुवारपणे सोडवत होती. होतीनव्हती ती सगळी संयमसहनशीलता एकवटून – ती अभिमानाने सगळ्यांना सांगत होती. "माझ्या पतींच्या कंपनीत पेन्शन योजना नव्हतीच. परंतु अंतिम दूरदृष्टीने आणि पतिचे कर्तव्य तडीस नेण्यासाठी – घरगुती लेडिज होस्टेल सुरू करून देऊन – माझ्यासारख्या सर्व अननुभवी स्त्रीला – कुठल्याही अर्जाशिवाय – शासकीय नोकरीशिवाय – शासनाची कुठलीही निवृत्तीची 'लक्ष्मणरेषा न आखता, त्यांनी आजन्म विनासायास 'पेन्शनची' कायमची सोय करून दिली." माझ्या 'पतिपरमेश्वराची सप्तजन्माची ही जाणीव आहे फार सुशिक्षित नाही परंतु अशिक्षितही नाही अशा माझ्यासारख्या स्त्रियांनी – 'प्रतीक नावाची संस्था – सोसायटी स्थापन करून 'घरगुती लेडिज होस्टेल सुरू करावे – किंबहुना आजन्म पेन्शन योजनेची अंमलबजावणी करून स्वतःच्या पायावर 'उद्योजिका व्हावे आणि धीटाईने जीवन जगावे. त्यामुळे कोणाला तरी आधार – अनुभव – उद्योग शिकून स्वार्थ – परमार्थ साधता येईल. समाजातील फसव्या प्रवृत्तीपासून सुरक्षित राहून – कुठलाही डाग न लागता – स्वच्छ चारित्र्याच्या सावित्रीच्या लेकी होता येईल. सावित्रीच्या ह्या क्रांतीला यश नक्कीच येईल". असं सांगत – प्रतिक्षाने – अष्टसात्विक भावांची सुमनांची – प्रतिक्षाने – स. मनाने प्रतिकच्या फोटोला समर्पित केली – त्याची उतराई झाली.

सुधा मराठे
कोथरूड, पुणे – ४११०३८.
Mo – ९९२१२१5334.